महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ ०९ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २२४ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# काळू धरणासाठी प्रशासन ठाम

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाडः** स्थानिकांचा विरोध आणि पर्यावरणीय परवानग्यांअभावी गेली १५ वर्षे रखडलेल्या काळू धरण प्रकल्पाचा पाटबंधारे विभागाने पुन्हा पाठपुरावा सुरू केला आहे. गेल्यावर्षी स्थानिकांना या प्रकल्पाची माहिती देणे आणि त्यांची मते जाणून घेण्यासाठी प्रशासनाने ग्रामसभा घेतल्या होत्या. त्या ग्रामसभांमध्ये स्थानिकांनी स्पष्टपणे 'धरण नको' अशी भूमिका मांडली होती. आता पुन्हा नव्याने २५ फेब्रुवारी ते ११ मार्चदरम्यान संबंधित गावांमध्ये सभा आयोजित केल्या आहेत. त्यात अनुसुचित क्षेत्रातील भूसंपादन, जमीन हस्तांतरण, उचित पुर्नवसन आणि नुकसान भरपाई यासंदर्भात चर्चा होणार आहे. दरम्यान जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी नुकतीच प्रस्तावीत काळू धरण प्रकल्प परिसराला भेट दिली. ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात ज्या ठिकाणी हे धरण बांधण्याचा प्रस्ताव आहे, तो भाग पर्यावरणीय संवेदनशील (इको सेन्सिटिव्ह झोन) आहे. या धरणात ९९९ हेक्टर वन जमीन बुडणार आहे. सध्या इथे लाखो वृक्षांचा समावेश असलेले जंगल आहे. या व्यतिरिक्त १२६० हेक्टर खाजगी जमीन विकत घ्यावी लागेल. शिवाय संबंधित गावांचे पुनर्वसन करावे लागणार आहे.



काळू धरणाच्या जागेची पाहणी

### स्थानिकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न

खाजगी वाटाघाटीद्वारे स्थानिकांना योग्य मोबदला देण्याचे आश्वासन देऊन त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न अधिकारी ग्रामसभेत करणार आहेत. समृद्धी महामार्ग तसेच बारवी विस्तारीकरण प्रकल्पांनाही सुरूवातीला विरोध झाला होता. मात्र प्रकल्पग्रस्तांना योग्य नुकसानभरपाई आणि मोबदला दिल्यानंतर विरोध मावळला, असा प्रशासनाचा अनुभव आहे. प्रत्येक प्रकल्पग्रस्त कुटुंबातील एका व्यक्तीला सरकारी नोकरी देण्याचा बारवी धरण विस्तारीकरण प्रकल्प पॅटर्न काळू प्रकल्पातही राबवला जाईल, अशी माहितीही सूत्रांनी दिली.

### ग्रामसभांचे वेळापत्रक

२५ फेब्रुवारी रोजी करचोंडे (कुडशेत) आणि जडई, २६ फेब्रुवारी-भोरांडे (फांगणे) आणि दिवाणपाडा, २७ फेब्रुवारी- भोरांडे आणि उदळडोह, २ मार्च- तळेगाव आणि तळेगाव (खरशेत उमरोली), ४ मार्च- फांगुळगव्हाण आणि माळ, ५ मार्च- दिघेफळ आणि वैशाखरे, ६ मार्च- फांगळोशी, ९ मार्च- न्याहाडी आणि खुटल बारागाव, १० मार्च- मोरोशी आणि झाडघर, ११ मार्च- चासोळे आणि आंबिवली अशा १९ ग्रामसभा आयोजित करण्यात आल्या आहेत.

> कोणताही प्रकल्प राबवताना आवश्यक परवानग्या घ्याव्या लागतात. अटी-शर्तींचे पालन करावे लागते. नव्याने काळू धरणाचा पाठपुरावा करताना संबंधित अधिकारी सर्व काही कायद्यानुसार करतील, अशी अपेक्षा आहे.
> - इंदवी तुळपुळे, श्रमिक मुक्ती संघटना, मुरबाड.

> धरणाचे काम सुरू करण्यापूर्वी स्थानिकांचे योग्य पुनर्वसन करावे. त्यांना योग्य तो मोबदला मिळावा, असा आमचा आग्रह आहे. स्थानिकांना विश्वासात घेऊनच काळू धरण प्रकल्प राबवला जाईल.
> - किसन कथोरे, आमदार, मुरबाड.

# कांजूरमार्ग ते बदलापूर मेट्रो प्रकल्पाला चालना

## मेट्रोसह पाणी पुरवठा प्रकल्पांना अर्थसहाय्य करण्याविषयी चर्चा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर** : महामुंबईच्या वेशीवरील झपाट्याने विस्तारणाऱ्या शहरांना उपयुक्त ठरणाऱ्या कांजूरमार्ग-बदलापूर मेट्रो १४ प्रकल्प लवकरच दृष्टिक्षेपात येण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंबरनाथ येथील पालिका निवडणुकीच्या प्रचारसभेत हा प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावणार असल्याचे सांगितले आहे. गुरूवारी

या प्रकल्पाला अर्थसहाय्य करण्यासंदर्भात ओपेक फंड फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंटच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांची भेट घेतली. या भेटीत मेट्रो १४ आणि पाणी पुरवठा प्रकल्पांसाठी अर्थसहाय्य करण्याविषयी सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती एमएमआरडीए सूत्रांकडून मिळाली. कांजूरमार्ग-बदलापूर या मेट्रोचा अंदाजे खर्च १८ हजार कोटी इतका आहे.

ओपेक फंड फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट ही संस्था एमएमआरडीएच्या मेट्रो मार्ग- ५ अर्थात ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रोसाठी 'सिस्टम कंपोनंट्स' चे वित्तपुरवठा भागीदार आहे. त्याचबरोबर आता मेट्रो मार्ग १४ सह मुंबईतील महत्त्वाच्या पाणीपुरवठा प्रकल्पांसाठीही आर्थिक सहभाग देण्याची संस्थेची तयारी आहे.

मुंबई महानगर परिसरातील वेगाने विस्तारणारे शहर असूनही अंबरनाथ, बदलापूरकरांना तुलनेने अत्यंत अपुऱ्या आणि नित्कृष्ट दर्जाच्या नागरी सुविधा मिळत आहेत. या भागातील लोकल सेवा अपुरी आहे. वाहतूक कोंडीमुळे रस्ते प्रवास अत्यंत त्रासदायक ठरतो. त्यामुळे मेट्रो सेवा या भागासाठी वरदान ठरणार आहे.



### आंतरराष्ट्रीय ओपेक संस्थेच्या शिष्टमंडळाने घेतली एमएमआरडीए आयुक्तांची भेट

### अशी असेल कांजूरमार्ग-बदलापूर मेट्रो

कांजूरमार्ग-बदलापूर मेट्रो मार्ग अंदाजे ३८ ते ४५ किलोमिटर इतक्या लांबीचे असेल. त्यात १५ ते २० स्थानके प्रस्तावित आहेत. त्यात कांजूरमार्ग, विक्रोळी, लालबहादूर शास्त्री मार्ग, शिळफाटा, महापे, घणसोली, ऐरोली, तुर्भे, दिघा, अंबरनाथ आणि बदलापूर अशी स्थानके असतील. या मेट्रोचे कांजूरमार्गमधील स्थानक भूमिगत असेल. तसेच ठाणे खाडीखालून बोगद्याद्वारे मार्ग काढला जाण्याचा प्रस्ताव आहे. मेट्रो – १४ बहुतांशी उन्नत स्वरूपात असल्याने भूसंपादनाचे प्रमाण इतर प्रकल्पांपेक्षा कमी आहे. त्यामुळे हा प्रकल्प लवकर मार्गी लागेल, असा विश्वास संबंधित सूत्रांनी व्यक्त केला आहे.

### याचवर्षी काम सुरू होणार ?

या मेट्रो मार्गाचा अंदाजे खर्च १८ हजार कोटी रूपये इतका आहे. त्यामध्ये स्थानके, पुल-बोगदे, सिग्नल आणि विद्युत प्रणालीचा समावेश आहे. प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मंजुरी मिळाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दोघेही या प्रकल्पाचा पाठपुरावा करीत आहेत. शक्यतो याच वर्षी (२०२६) काम सुरू करून २०३० पर्यंत या मार्गावरील मेट्रो सेवा सुरू करण्याची प्रशासनाची योजना आहे.

> कांजूरमार्ग-बदलापूर मेट्रो १४ चा लाखो सर्वसामान्य प्रवाशांना लाभ होणार आहे. बदलापूर- मुंबई दरम्यानचा प्रवास त्यामुळे सुकर होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्राधान्याने हा प्रकल्प मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या आहेत. लवकरात या प्रकल्पाचे काम लवकरात लवकर प्रत्यक्षात सुरू होईल.
> - किसन कथोरे, आमदार, बदलापूर.

## लक्षवेधी

# राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांत विरोधी पक्षनेतेपदाची स्पर्धा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : सन्मानजनक पद मिळाले नाही तर विरोधी पक्षात बसण्याची भूमिका घेणारी भाजप सत्तेत सामील झाल्यानंतर आता विरोधी पक्षनेते पदासाठी दोन्ही राष्ट्रवादीमध्ये चुरस निर्माण झाली आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे 12 नगरसेवक निवडून आले आहेत. तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे 9 नगरसेवक निवडून आले आहे.

दोन्ही राष्ट्रवादीचे विलीनीकरण झाले तरी, तरी एमआयएमच्या पाच नगरसेवकांचा पाठिंबा आम्हाला असल्याचा दावा अजित पवार गटाने केला असल्याने विरोधीपक्षनेते पदासाठी अजित पवार गटाचेच पारडे जड असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

ठाणे महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये शिंदेच्या शिवसेनेचे 75 नगरसेवक निवडून आले असून त्यांना स्पष्ट बहुमत मिळाले आहे. तर युतीमध्ये निवडणूक लढवल्याने भाजपला याचा सर्वाधिक फटका पडल्याने त्यांचे केवळ 28 नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे महापौरपदी शिवसेनेचा नगरसेवक विराजमान होणार हे निश्चित झाले होते. मात्र जर सन्मानजनक पदे नाही मिळाली तर विरोधी बाकावर बसण्याची भूमिका भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी घेतली होती.

# जातीअंताबाबत संघाची भूमिका स्पष्ट
## - मोहन भागवत




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

हिंदू धर्मात जातीची उतरंड आणि जातीभेद, पोटजाती, जाती व्यवस्था असे अनेक वाद आहेत. त्याविषयी टीका आणि नाराजी पाहायला मिळते. जाती व्यवस्था हा हिंदू धर्मातील प्रमुख घटक आहे. जातीअंताच्या लढाईत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिका काय असा प्रश्न कायम विचारल्या जातो. डावी चळवळ आणि पुरोगामी, अनुसूचित जाती संघटना, बहुजन समाजातून संघाला याविषयी कायम विचारणा होते. याविषयावर सरसंघचालक मोहन भागवत यांनी मन मोकळं केलं. त्यांनी या विषयावर संघाची भूमिका स्पष्ट केली.

अखंड भारताची इच्छा

2047 मध्ये भारताचं विभाजन होईल ही भीती बाळगण्यापेक्षा 2047मध्ये अखंड भारताची कल्पना करा. सुलतान, बादशाह 500 वर्ष राहिला, इंग्रजांना 200 वर्षात जमलं नाही ते आता कसं होईल. स्वतंत्र भारतात तर शक्यच नाही. आता हा 1947 पूर्वीचा भारत राहिला नाही. अखंड भारत होईल आणि करून दाखवू ही इच्छा मनात बाळगा. भारताचे तुकडे होईल असं काही लोक स्वप्न पाहत आहेत.ते पूर्ण होणार नाही, असे सरसंघचालकांनी ठणकावून सांगितलं.

# केडीएमसी क्षेत्रात साकारणार ऑटिजम व्हिलेज

## कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा एक आगळावेगळा उद्यान प्रकल्प

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : महानगरपालिकेने एक आगळा वेगळा प्रकल्प साकारला जात असून यामध्ये आता महापालिका क्षेत्रातील बारावे (रिंग रोड लगत ) परिसरात ऑटिजम व्हिलेज व्हिलेज साकारले* जात आहे.

हे ऑटिजम व्हिलेज* व्हिलेज सुमारे १२७७२ चौ मी इतक्या परिसरात तयार होत असून ऑटिजम व्हिलेज अंतर्भूत असलेल्या उद्यानात एका बाजूस ऑटिजमग्रस्त मुलांसाठी ऑटिजम व्हिलेज आणि दुसऱ्या बाजूला सर्वसामान्य नागरिकांसाठी उद्यान साकारले जात आहे.या ऑटिजम व्हिलेज मध्ये स्वमग्नता असणाऱ्या मुलांसाठी sensory garden ,sensory pathway, sensory play equipments , meditation center, therapy center इत्यादी सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या आहेत. यामुळे महापालिका आणि एमएमआर रिजन मधील ऑटिजम रुग्णांना थेरेपी सुविधा उपलब्ध होणार आहे.उर्वरित भागात भव्य उद्यान , आधुनिक कारंजे, बास्केटबॉल कोर्ट ,एम्पोथिएटर, मियावाकी जंगल, स्केटिंग रिंग, जॉगिंग आणि सायकलिंग ट्रॅक, कॅफेटेरिया , टॉयलेट, सोलर सिस्टम अशा विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.





विशेष म्हणजे हे ऑटिझम व्हिलेज Mere realty या विकासकांमार्फत Aminity TDR मधून तयार होत असून महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आज सदर स्थळी पाहणी करून दिनांक 2 एप्रिल रोजी "World Autism Awareness Day" ला या ऑटिझम व्हिलेजचे लोकार्पण होण्याच्या दृष्टीने कामकाज पूर्ण करणे बाबत संबंधितांना निर्देश दिले तसेच दर सप्ताहात स्थळपाहणी करून आढावा घेतला जाईल असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.यावेळी सहा संचालक नगररचना संतोष डोईफोडे, मुख्य उद्यान अधीक्षक संजय जाधव व विकासक सुदेश मोर्यानी,जय लालवानी, सुनील पुनेजा, दिलीप पाठारे व कन्सल्टंट सूरज पाटील उपस्थित होते..

# ओला-उबेर-रॅपिडो संपावर परिवहन मंत्र्यांचा संताप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ओला, उबेर, रॅपीडोच्या संपावरून राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संताप व्यक्त केला आहे. शासनाकडून काय मदत हवी आहे, नेमक्या तुमच्या अपेक्षा काय आहेत हे स्पष्टपणे सांगावे. राज्य शासन त्याचा विचार करेल, मात्र अशाप्रकारे संप करून नागरिकांना वेठीस धरणार असला तर योग्य ती कारवाई करावी लागेल, असा इशारा मंत्री सरनाईक यांनी दिला आहे.

राज्यात बेकायदेशीररित्या चालवण्यात येणाऱ्या टॅक्सी आणि बाईकच्या विरोधात तसेच अँप आधारित काम कंपन्यांनी लागू केलेल्या मनमानी भाड्याच्या विरोधात शनिवारपासून ओला, उबेर मालकांनी संप पुराकला आहे. या संपामुळे सर्वसामान्य प्रवाशांचे हाल झाले. यासंदर्भात ठाण्यात प्रसार माध्यमांशी संवाद साधताना सरनाईक यांनी मात्र ओला, उबेर चालक मालकांवर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

# रुग्णसेवेत हलगर्जीपणा नको
## – आयुक्त गोयल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** पालिकेची कल्याणमधील रुक्मिणीबाई, डोंबिवलीतील शास्त्रीनगर रुग्णालयात रुग्णांचा उपचारासाठी सर्वाधिक ओढा आहे. ही रुग्णालये यापूर्वी रुग्ण सेवेवरून नेहमीच चर्चेचा विषय राहिली आहेत. त्यामुळे या रूग्णालयात रुग्णांना आवश्यक वैद्यकीय उपचार केले जातात की नाही याची पाहणी करण्यासाठी आयुक्त अभिनव गोयल यांनी शनिवारी सकाळी आठ वाजता डोंबिवलीतील शास्त्रीनगर रुग्णालयास भेट देऊन रुग्ण सेवेच्या सुविधांची माहिती स्थानिक वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांकडून घेतली.

### आयुक्त गोयल यांची शास्त्रीनगर रुग्णालयाला अचानक भेट

गेल्या वर्षभरात पालिकेची शास्त्रीनगर रुग्णालये वैद्यकीय रुग्ण सेवेच्या विविध कारणांनी नेहमीच वादग्रस्त ठरली. रुग्णसेवेच्या विषयांवरून आयुक्त गोयल यांनी पालिका रुग्णालयांमधील डॉक्टर, कर्मचारी, रुग्णवाहिका चालक अशा एकूण सात ते आठ कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली. रुग्णालय प्रशासनावर वचक नसल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. आरोग्य प्रशासनातही असाच सावळागोंधळ होता. पण, आयुक्त गोयल यांनी कोणाच्याही दबावाला न बळी पडता आरोग्य विभागातील ठाणमांड्या कर्मचाऱ्यांवर निलंबन, नोटिसा देणे, सेवामुक्तीची कारवाई केली आहे. काही कर्मचाऱ्यांना संबंधित विभागातून बदलून अन्य विभागात बदली केले आहे. त्यामुळे आता पालिका रुग्णालयांमध्ये सुस्थितीत कारभार सुरू झाला आहे. यापूर्वी आयुक्तांनी पालिका रुग्णालयांना अचानक भेटी देऊन रुग्ण सेवेसंदर्भात चांगल्या सूचना केल्या होत्या. त्याची अंमलबजावणी रुग्णालय प्रशासनाकडून केली जाते की नाही याचीही तपासणी या अचानक पाहणी दौऱ्यात आयुक्तांनी केली.

# विमान प्रवासात विद्यार्थ्याची जीवनरक्षक कामगिरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

विमानातून प्रवास करताना अनेकांना भीती वाटते. विमानाता आकाशात झेपावल्यानंतर आपल्याला काही झालं तर ही भावना अनेकांना भीतीदायक वाटते. मात्र तुमच्या विमानाक आर्यनसारखा मोडिकलचा विद्यार्थी असेल तर तुम्हाला चिंता करण्याचं कारण नाही. गोवा-मुंबई इंडिगो विमान प्रवासादरम्यान वसईच्या डॉ. आर्यन लोलयेकर याच्या प्रसंगावधानामुळे एका सहप्रवाशाचा जीव वाचला. पालघर जिल्ह्यातील वेदांत मेडिकल कॉलेजचा अंतिम



वर्षाचा विद्यार्थी असलेल्या डॉ. आर्यन याने विमानातच तातडीने उपचार करून आपले कर्तव्य बजावले.

३ फेब्रुवारी रोजी मुंबईकडे निघालेल्या विमानात एका प्रवाशाला श्वास घेण्यास तीव्र त्रास होऊ लागला. क्रू मेंबर्सच्या आवाहनानंतर डॉ. आर्यन यांनी रुग्णाची तपासणी करत रक्तातील साखर झपाट्याने कमी होत असल्याचे ओळखले. त्यांनी त्वरित प्रथमोपचार करत आपत्कालीन विमानात उपलब्ध असलेल्या आपत्कालीन ऑक्सिजन सिलिंडरचा वापर करून रुग्णाला कृत्रिम श्वासोच्छ्वास देण्यात आला. डॉ. आर्यन यांच्या या तत्परतेमुळे काही वेळातच रुग्णाची प्रकृती स्थिर झाली. त्यानंतर सुमारे ४५ मिनिटांच्या प्रवासानंतर विमान मुंबई विमानतळावर सुरक्षित उतरले. तिथे इंडिगोच्या ग्राउंड स्टाफने रुग्णाला पुढील उपचारांसाठी तातडीने रुग्णालयात हलवले.





# "एकनाथ शिंदे- शब्दाला जागणारा माणूस"

# एका निर्णयात शिक्षकांना ११०० कोटी

विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांच्या वेतनाबाबत साहेबांना भेटायचं आहे अशी गळ शिवसेनेचे सचिव माझे मित्र संजय मोरे यांना घातली. त्यांनी "रात्री साहेबांच्या बंगल्यावर या" असा निरोप दिल्यानंतर आम्ही काही शिक्षक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांच्या बंगल्यावर भेटायला गेलो राज्यात विधानपरिषद निवडणुकांची धामधूम सुरू होती अशात साहेब किती वेळ देतात? याबाबत शंका होती . बोला बोरनारे असं म्हणताच मी वेळ न घालवता साहेब मागील अनेक वर्षापासून विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांना वेतन नसल्याने कोणी शाळा सुटल्यावर विद्यार्थ्यांच्या शेतात काम करतोय कोणी वडापावची गाडी चालवतोय सलून मध्ये केस कापतोय भाजीपाला विकतोय ढकलगाडी चालवून आपली उपजीविका भागवतोय अशा राज्यातील शिक्षकांना वेतनाचा पुढील टप्पा घोषित करा. क्षणभर माझ्याकडे बघून एकनाथ शिंदे साहेबांनी लगेच शिक्षण सचिवांना कॉल केला विनाअनुदानित शाळांच्या शिक्षकांच्या वेतनासाठी किती निधी लागेल? हे सकाळ पर्यंत सांगा हे काम मला एका महिन्याच्या आत करायच आहे असं सांगून कॉल कट केला आणि आम्हाला उशीर झाला आहे जेऊन जा असं आम्हाला सांगितलं. आणि बरोबर एक महिन्यांनी मंत्रिमंडळ बैठकीमध्ये एकनाथ शिंदे साहेबांनी विनाअनुदानित शाळांमध्ये काम



करणाऱ्या शिक्षकांसाठी मोठी घोषणा केली.

राज्यातील सरकारमान्य खासगी अंशतः अनुदानित शाळांना २० टक्के अनुदानाचा वाढीव टप्पा निधीसह मंजूर करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या निर्णयाला मंजुरी देण्यात आली. या निर्णयानुसार राज्यातील खासगी अंशतः अनुदानित ज्या शाळांनी निकषांची पूर्तता केली आहे, अशा ८२० प्राथमिक शाळा, तीन हजार ५१३ वर्ग/ तुकड्या व त्यावरील आठ हजार ६०२ शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी, एक हजार ९८४ माध्यमिक शाळा, दोन हजार ३८० वर्ग/तुकड्या व त्यावरील २४ हजार २८ शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी, तीन हजार ४० उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय, तीन हजार ४३ वर्ग/ तुकड्या/ अतिरिक्त शाखा व त्यावरील १६ हजार ९३२ शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी विविध टप्पावर वेतन अनुदान घेत आहेत. त्यांची एकूण संख्या ८४४ शाळा, आठ हजार ९३६ वर्ग/तुकड्या/ अतिरिक्त शाखा व त्यावरील एकूण ४९ हजार ५६२ शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी एवढी आहे. त्यांना २० टक्के अनुदानाचा पुढील टप्पा जाहीर करण्यात आला राज्यातील शाळांना तब्बल 1100 कोटींचं अनुदान दिलं.

सर्व शाळा आणि तुकड्यांना 20 टक्क्यांपर्यंत अनुदान देण्याचा निर्णय घेतला. ज्यांना अनुदान नाही त्यांना 20 टक्के अनुदान, ज्यांना 20 टक्के अनुदानाच्या टप्प्यात आहेत त्यांना 40 टक्के अनुदान आणि ज्यांना 40 टक्के आहे त्यांना 60 टक्के अनुदान देण्याबाबतचा निर्णय झाला या निर्णयामुळे 63 हजार 338 शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना याचा लाभ झाला शासनाला दरवर्षी 1160 कोटी एवढा अतिरिक्त बोजा येऊन सुद्धा एकनाथ शिंदे यांनी दिलेला शब्द पूर्ण केला.

2016 मध्ये अनुदानाचा टप्पा जाहीर झाल्यावर सुद्धा जीआर निघत नसल्यामुळे कोकण विभागाचे शिक्षक आमदार रामनाथ मोते व मी आम्ही आजच जीआर निघाल्यास शिवाय मंत्रालयातून उठणार नाही प्रसंगी चौथ्या माळयावरून उडी टाकू अशी धमकी अधिकाऱ्यांना दिल्याने 20 टक्के अनुदान जीआर जाहीर झाला होता त्यानंतर मध्ये अनेक वर्ष पुढचा टप्पा लालफीती मध्ये अडकला होता तो एकनाथ शिंदे यांनी काढून शिक्षकांच्या घरातील विझलेली चूल पुन्हा पेटवली मंत्रालयात व मंत्र्यांच्या बंगल्यावर आपल्याला आश्वासनांचा पूर पाहायला मिळतो परंतु प्रत्यक्षात दिलेला शब्द पाळून निधीचा महापूर आणणारी एकनाथ शिंदे हे अपवाद आहे

**अनिल बोरनारे**
**अध्यक्ष मुंबई**
**मराठी अध्यापक संघ**

गरीब कुटुंबातील एका पित्याने आत्महत्या केलेल्या व उच्च शिक्षणासाठी पुरेसे पैसे नसलेल्या एका मुलीचा एकनाथ शिंदे यांना रात्री फोन येतो लगेच मध्यरात्री दोन वाजता मंत्रिमंडळातील आपल्या सहकारी मंत्र्यांना फोन करून अशी योजना की त्यातून मुलीला मोफत उच्च शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण मिळेल आणि दुसऱ्याच आठवड्यात मुलींना मोफत शिक्षणाचा शासन निर्णय जारी होतो हे फक्त एकनाथ शिंदेच करू शकतात.

"शिक्षण विभागाच्या निधीला खर्च म्हणून नाही तर भविष्यातील गुंतवणूक म्हणून पहा" असे अधिकाऱ्यांच्या बैठकीत ठणकावून सांगून सरकारी शाळांच्या सक्षमीकरण करता अर्थसंकल्पातील 16 टक्क्याहून अधिक निधी शिक्षण विभागाला देण्यास एकनाथ शिंदे यांनी भाग पाडले त्यामुळे आज सरकारी शाळांनी मोठी झेप घेतली आहे

सरकारी व अनुदानित शाळा या सीबीएससी आयसीएससी वा आंतरराष्ट्रीय शाळांच्या बरोबरीने पुढे जायला हव्यात यासाठी मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा ही अभियान त्यांनी आणले शाळांचे आधुनिकीकरण सौंदर्यकरण आणि गुणवत्तेत सुधारणा व्हावी हे प्रमुख उद्दिष्ट या योजनेचे होते या योजनेतून शेकडोशाळांना कोट्यावधी रुपयांचा निधी मिळून शाळा हायटेक झाल्या आहेत

शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा असलेल्या व बाळासाहेबांप्रमाणेच शब्दाला जागणाऱ्या एकनाथ शिंदे साहेब यांना वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा!

# पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा

मानवी जिवनाचे अंतिम सत्य काय आहे तर तो मृत्यू आहे. त्यावर कोणालाही विजय मिळवता आला नाही. रंक असो वा राजा प्रत्येकाला हे नश्वर जग सोडून जावे लागणार आहे. फक्त कधी जायचे आहे हे मात्र माहित नाही, पण प्रत्येकाची वेळ मात्र ठरलेली आहे.

या जगात माणूस स्वतंत्र नाही. तो अनेक गोष्टींवर अवलंबून (पराधीन) आहे. निसर्ग, समाज, परिस्थिती, कुटुंब, पैसा, सत्ता या सगळ्यांच्या प्रभावाखाली मानवाचे जीवन चालते. विचारसौंदर्य असे सांगते की माणूस स्वतःला सर्वशक्तिमान समजतो, पण प्रत्यक्षात तो पूर्णपणे स्वतंत्र नाही. जन्मापासून मृत्यूपर्यंत माणूस निसर्गावर अवलंबून असतो. हवा, पाणी, अन्न यांशिवाय तो जगू शकत नाही.

माणूस समाजावर अवलंबून आहे. शिक्षण, संस्कार, नाती, नियम हे सगळे समाज देतो. तो परिस्थितीचा गुलाम असतो. वेळ, नशीब, आर्थिक अवस्था यानुसार त्याचे निर्णय बदलतात. निसर्ग अहंकार आणि वास्तवाची त्याला जाणीव करून देतो. तत्त्वज्ञानात्मक व वास्तववादी भूमिका दिसून येते.माणसाच्या असहायतेची जाणीव होते.यावर माणूस कधीतरी आत्मपरीक्षण करणार आहे का? गर्व, ताठा कमी करून नम्रता स्वीकारणार आहे का? "पराधीन" हा शब्द अत्यंत प्रभावी आहे, तो माणसाच्या गुलामगिरीची जाणीव करून देतो."जगती पुत्र मानवाचा" या शब्दरचनेत मानवाला निसर्गाचा मुलगा मानले आहे, त्यामुळे त्याची मर्यादा ठळकपणे समोर येते.

माणसाने स्वतःला सर्वश्रेष्ठ समजू नये.निसर्ग, समाज आणि परिस्थिती यांचा आदर करावा. खरे स्वातंत्र्य अहंकारात नाही, तर वास्तव स्वीकारण्यात आहे.

"पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा" या ओळीत जीवनाचे कटू पण सत्य चित्र मांडले आहे. माणूस कितीही प्रगती करीत असला, तरी तो पूर्णपणे स्वतंत्र नाही, म्हणूनच विचार करायला लावणारी आणि अर्थपूर्ण आहे.

आज आपल्या सभोवताली अशा दुख्खद घटना घडतात की मन सुन्न होते."कोण दिवस येईल कैसा या देहाचा नाही भरवसा " ही संत उक्ती खरी ठरत असून उद्या कोणाचाच भरवसा नाही म्हणून जे जिवन मिळाले आहे ते आनंदाने जगा यातच सुखी जिवनाचा अर्थ दडलेला आहे. बाकी सर्व मिथ्य आहे...

**शब्दांकन**
**दिलीप पवार, मुरबाड**

# म. गांधी विद्यालयात दहावीचा निरोप समारंभ

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**टोकावडे :** जनसेवा शिक्षण मंडळ, मुरबाड या संस्थेच्या महात्मा गांधी विद्यालय, धसई येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ शुक्रवारी (ता. ६) उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला. दीर्घकाळ शाळेशी जोडलेल्या आठवणी, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि मित्रमैत्रिणींसोबतचे अनुभव यामुळे हा क्षण सर्वांसाठीच भावुक ठरला. समारंभात दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणी, अनुभव आणि शिक्षकांप्रती कृतज्ञता भाषणातून व्यक्त केली. शाळेशी असलेले जिव्हाळ्याचे नाते सुटताना त्यांच्या डोळ्यांत अश्रू अनावर झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वर्ग शिक्षक उमेश सोलसे यांनी केले. सूत्रसंचालनाची जबाबदारी रक्षा मोरे व वैदही बोराडे या इयत्ता नववीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी पार पाडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य संतोष सुरोशे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना येणाऱ्या दहावीच्या बोर्ड परीक्षांना सामोरे जाताना घ्यावयाच्या काळजीविषयी मार्गदर्शन केले. अभ्यासात सातत्य, योग्य नियोजन, आत्मविश्वास आणि शिस्त या गुणांचे महत्त्व विशद करत त्यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# बाजार समितीतील अस्वच्छ 'एनआयएफटी' परीक्षा केंद्राविरोधात विद्यार्थ्यांचा संताप

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील कल्याण कृषी बाजार समितीच्या आवारातील धान्य गोदामात रविवारी नवी दिल्ली येथील नॅशनल इन्सटिट्युट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी प्रवेश पूर्व परीक्षेचे केंद्र होते. या परीक्षा केंद्रातील गैरसोयी, परिसरातील दुर्गंधी, अस्वच्छता आणि अडगळीच्या जागेत हे केंद्र असल्याने विद्यार्थी, पालकांनी हे केंद्र निश्चित करणाऱ्या यंत्रणेविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली आणि संबंधितावर कठोर कारवाईची मागणी केली. वसई, विरार, डहाणू, गोरेगाव, मीरा भाईंदर, बोरिवली, मालाड परिसरातून विद्यार्थी, पालक या परीक्षा केंद्रावर पहाटे तीन ते चार वाजल्यापासून आले आहेत. मुंबईपासून दूर अंतरावर आणि अडगळीच्या जागेतील



कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील धान्य गोदामाचा भव्य सभागृह नियोजकांनी परीक्षा केंद्र म्हणून निश्चित केले आहे. या परीक्षेसाठी 'एनआयएफटी'ने प्रत्येक विद्यार्थ्याकडून दोन हजार परीक्षा शुल्क आकारले आहे. मग अडगळीच्या जागेतील परीक्षा केंद्र निवडण्यामागे परीक्षा आयोजकांचा नक्की उद्देश काय आहे, असे प्रश्न संतप्त पालकांनी केले.परीक्षेचा तणाव विद्यार्थी, पालकांवर असतो. प्रत्येक पालक आपला मुलगा परीक्षा केंद्रावर परीक्षा वेळेच्या अगोदर पोहचावा म्हणून प्रयत्नशील होता. सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत ही परीक्षा आहे. या परीक्षा केंद्रात आणि बाहेर विद्यार्थी, पालकांसाठी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह अशा कोणत्याही सुस्थितीमधील सुविधा नाहीत. महिला, पुरूषांसाठी एकच स्वच्छता गृह परीक्षा केंद्र भागात आहे. तेथे पाणी नाही. पाण्याचा एक पिंप बाहेर भरून ठेवण्यात आला आहे. पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही. परीक्षा केंद्र परीसरात कत्तलखाना आहे. त्यामुळे पहाटेपासून दुर्गंधीने विद्यार्थी, पालक हैराण आहेत. काही विद्यार्थ्यांनी उग्र दुर्गंधीमुळे वांती केल्याची चर्चा आहे. शाळा का वगळल्या.

रविवार असल्यामुळे मुंबई परिसरातील शाळा, महाविद्यालये बंद असतात. या शिक्षण संस्थांमध्ये, कंपन्यांची संगणकीकृत वातानुकूलित मोठ्या आकाराची सभागृहे असतात. ही सभागृह आयोजकांनी भाड्याने घेऊन मुंबईतच या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची सोय का केली नाही, असे प्रश्न विद्यार्थी, पालक करत आहेत.

पालक उन्हातपरीक्षा सुरू झाल्यानंतर पालकांना बसण्यासाठी बाहेर कोठे स्वच्छ जागा नाही. त्यामुळे बाजार समितीमधील बंद गाळयांच्या बाहेर पालकांनी जमिनीवर बैठक मारल्याचे चित्र आहे. काही पालकांनी आपल्या लहान मुलांना सोबत आणले आहे. ही मुले दुर्गंधीने त्रस्त आहेत. दुर्गंधीमुळे याठिकाणी घरून आणलेला नाष्टा खाण्याची हिम्मत होत नाही, असे काही पालकांनी सांगितले.

विद्यार्थी मेहनत घेऊन आपल्या क्षमतेने पुढे जाण्याचा प्रयत्न करतात. पालक आपला मुलगा, मुलगी शिक्षणातून पुढे जावी म्हणून कर्ज घेतात. मुलांना शिकवतात. त्यात घाणेरड्या, अस्वच्छ परीक्षा केंद्रापासून विद्यार्थ्यांना आपल्या पुढील शिक्षणाची वाटचाल करण्याचा शुभारंभ करावा लागत असेल तर शासनाला या मुलांनी पुढे जावे की घाणीतच अडकून पडावे असे वाटते ते एकदा जाहीर करावे, अशा संतप्त प्रतिक्रिया पालकांनी दिल्या.बाजार समितीमधील धान्य गोदाम सभागृह निश्चित करणाऱ्या संबंधितावर कठोर कारवाईची मागणी पालकांनी केली आहे.

# ठाणे जिल्ह्यातील सर्वात मोठ्या मॅटर्निटी हॉस्पिटलचे कल्याणमध्ये उद्घाटन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण शहराच्या आरोग्य सुविधांमध्ये मोठी भर घालत ठाणे जिल्ह्यातील सर्वात मोठ्या मॅटर्निटी हॉस्पिटलचे उद्घाटन आज कल्याणात करण्यात आले. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त अभिनव गोयल आणि जी.एस. मेडिकल कॉलेजच्या डॉ. पौर्णिमा सातोस्कर यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत या अत्याधुनिक वैष्णवी रुग्णालयाचे लोकार्पण सोहळा संपन्न झाला.




कल्याणातील सुप्रसिद्ध प्रसूतीतज्ञ डॉ. अश्विन कक्कर यांच्या पुढाकारातून हे सुसज्ज रुग्णालय उभारण्यात आले आहे. तळ मजला अधिक सात मजले अशा भव्य इमारतीमध्ये तब्बल ४८ बेडची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून हे रुग्णालय ठाणे जिल्ह्यातील सर्वात मोठ्या मॅटर्निटी हॉस्पिटलपैकी एक ठरले आहे.सर्व तुम्ही जे काम कराल ते फलदायी होईल अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेला शस्त्रक्रिया कक्ष, लेबर कक्षासह नवजात अर्भकांना बाहेरून येणाऱ्या लोकांकडून कोणताही संसर्ग होऊ नये यासाठी विशेष काळजी या रुग्णालयात घेण्यात आली आहे. डॉ. अश्विन कक्कर यांना २३ वर्षांचा प्रदीर्घ

## केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल आणि डॉ. पौर्णिमा सातोस्कर यांच्याहस्ते वैष्णवी मॅटर्निटी हॉस्पिटलचे उद्घाटन

अनुभव असून त्यांच्या जुन्या रुग्णालयात ४३ हजारांहून अधिक महिलांची प्रसूती करण्यात आली आहे. विशेष म्हणजे यापैकी सुमारे ७० टक्के प्रसूती नैसर्गिक पद्धतीने झाल्याची माहिती त्यांनी दिली.यावेळी बोलताना डॉ. कक्कर म्हणाले की, या नव्या रुग्णालयासाठी आपल्याला कोविड काळात केडीएमसीचे माजी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी प्रेरणा दिली. तर तत्कालीन आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी जागेच्या अडचणी दूर केल्या आणि विद्यमान आयुक्त अभिनव गोयल यांनी आवश्यक त्या शासकीय परवानग्या वेळेत उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे विक्रमी २६ महिन्यांत ही भव्य इमारत उभी राहू शकल्याचेही ते म्हणाले. या नव्या रुग्णालयामुळे परिसरातील महिलांना आधुनिक आणि आणखी सुरक्षित प्रसूती सेवा उपलब्ध होणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# प्रभाग सुरक्षेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**



**कल्याण :** नागरिकांना स्वच्छ आणि सुंदर प्रभागासोबतच सुरक्षित वातावरण मिळावे, या उद्देशाने युवासेनेतर्फे पुढाकार घेण्यात आला आहे. युवासेना डोंबिवली शहर अध्यक्ष सागर जेधे यांनी आपल्या प्रभागात नागरिकांच्या सुरक्षेसाठी विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास प्रारंभ केला आहे. कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.

प्रभाग अधिक स्वच्छ, सुरक्षित आणि शिस्तबद्ध व्हावा, यासाठी डोंबिवलीतील बॅडमिंटन कोर्टजवळ, जय मल्हार सोसायटी परिसर, डी.एन.सी. शाळेमागील भाग, देवकी निवास व अंबर कॅसल इमारतीजवळ, नील पद्मा हॉल व रॉयल वैलनसिया सोसायटी परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येत आहेत.

प्रभाग स्वच्छ, सुंदर व सुव्यवस्थित ठेवण्यासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन सागर जेधे यांनी केले आहे.

# भविष्यवेध



**सोमवार**
**०९ फेब्रुवारी २०२६**

### मेष
कुटुंबासोबत थोडा वेळ घालवण्याचा आनंद तुम्हाला मिळेल. तुम्ही तुमची नियोजित कामे स्वतःहून पूर्ण करू शकाल. विद्यार्थ्यांसाठी हा दिवस चांगला आहे.

### वृषभ
दिवस संमिश्र असेल.अनेक बाबींवर मनात काही नवीन आणि सकारात्मक कल्पना येतील. तुमचे शब्द तुम्हाला सर्वकाही पूर्ण करण्यास मदत करतील.

### मिथुन
आधी केलेल्या मेहनतीचे फळ मिळेल. बेरोजगारांना आज नोकरीच्या ऑफर मिळू शकतात. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस अनुकूल आहे.

### कर्क
संगीताशी संबंधित संस्थेत प्रवेश घेण्यासाठी हा शुभ दिवस आहे.तुम्ही तर्कशुद्ध बोलाल. कॉलेजमधील चांगल्या कामगिरीने शिक्षक खूश होतील.

### सिंह
तुमचे आरोग्य खूप चांगले असेल. आज नशीब तुमच्या बाजूने आहे. एखाद्या वृद्ध व्यक्तीचा सल्ला तुमचे तुटलेले नाते सुधारण्यास मदत करेल.

### कन्या
जोखीम असलेल्या उपक्रमाची सुरुवात करू शकता; त्यात यशस्वी झाल्यास तुमचा आत्मविश्वास वाढेल. वैयक्तिक कामांमध्ये व्यतीत होईल.

### तुळ
नशीब तुमच्या बाजूने आहे; कामाच्या ठिकाणी पदोन्नती किंवा प्रशंसा मिळण्याची शक्यता आहे. नवीन व्यवसाय संधींचा शोध घेतला जाऊ शकतो.

### वृश्चिक
आयुष्यात सकारात्मक बदल घडतील. जॉब शोधत असतील त्यांना चांगली संधि मिळेल. तुम्ही जे काम कराल ते फलदायी ठरेल. वेळ तुमच्या बाजूने आहे.

### धनु
तुमचे मन आनंदी असेल आणि तुमच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडतील. कठोर परिश्रमामुळे काही आर्थिक फायदा देखील होऊ शकतो.

### मकर
वादविवाद टाळा, कारण तुम्ही अनावश्यक अडचणीत येऊ शकता. आज काळजीपूर्वक वाहन चालवा. नोकरीत किंवा व्यवसायात नफ्याच्या अनेक संधी मिळू शकतात.

### कुंभ
तुम्ही शांत मनाने कोणतेही काम केले तर ते लवकरच पूर्ण होईल. कुटुंबातील कोणताही निर्णय घेण्यापूर्वी, वडिलांचा सल्ला घ्या, कारण ते फायदेशीर ठरेल.

### मीन
स्पर्धा परीक्षेच्या निकालांमध्ये यशस्वी व्हाल. मोठ्या कामासाठी तुम्हाला खूप धावपळ करावी लागू शकते. आर्थिक परिस्थिती मजबूत राहील.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

# भिवंडीत गोदामाला भिषण आग

## लाखो रूपयांची मालमत्ता जळून खाक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी :** भिवंडी तालुक्यातील मानकोली - दापोडा परिसरात असलेल्या हरिहर कंपाऊंड मध्ये ट्रान्सपोर्ट मालाची साठवणूक केलेल्या दोन मजली असलेल्या गोदामाला आज सायंकाळी भीषण आग लागली.या भिषण आगीमध्ये कापडाच्या गाद्या व कागदी पेपर रोलचा माल व इतर मालमत्ता सामान जळून खाक झाला आहे. भिवंडी अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन ही आग विझवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे ही आग कशामुळे लागली याबाबत मात्र अद्याप कारण समजले नसल्याची माहिती अग्निशमन दलाच्या जवानांना दिली.

भिवंडी - ठाणे महामार्गावरील अंजुर फाटा,वळगाव, राहनाळ,पूर्णा,कोपर, काल्हेर,कशेळी,मानकोली,दापोडा अशा विविध ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात ट्रान्सपोर्ट मालाची साठवणूक करणारी गोदामे आहेत. यातील बहुतांश गोदामात अग्निसुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे या गोदामांमध्ये वारंवार भीषण आगी लागण्याचे प्रकार घडत आहेत आज सायंकाळी दापोडा परिसरात असलेल्या हरिहर कंपाऊंड मधील कापडी गादया व कागदी पेपर रोल साठविण्यात आलेल्या ए विंग मधील गोदामाला भिषण आग लागली त्यामुळे परिसरात काम करणारे कामगार व नागरिकांची भितीने धावपळ उडाली आगी ची तीव्रता पाहून नागरिकांनी पोलीस व भिवंडी अग्निशमन दलाला या घटनेची माहिती दिली त्यामुळे जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन रासायनिक द्रव्य मिश्रित पाण्याचा मारा सुरू केला मात्र याआगीने रौद्ररूप धारण केले आहे त्यामुळे ही आग विझवण्यासाठी शर्तीचे प्रयत्न सुरू झाले आहेत पाण्याची कमतरता असल्यामुळे अधिक प्रमाणात पाण्याचे टँकर मागविण्यात आले असून आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाच्या जवानांनी प्रयत्न सुरू केले आहेत.कापडी कापूस, स्पंज व कागदी सामान व इतर साहित्य असल्याने या आगीने रौद्ररूप धारण केले असून काळया धुराचे लोट आकाशात पसरून सर्वत्र मोठ्या प्रमाणात प्रदूषण पसरले आहे. त्यामुळे उपस्थित अग्निशमन दलाच्या जवान व नागरिकांना खोकल्याचा त्रास झाला.गोदामात ट्रान्सपोर्टव्दारे येणारा माल सुरक्षित ठेवून काळजी घेणे आवश्यक आहे मात्र अनेक वेळा दुर्लक्ष होत असल्याने या आगीचे प्रकार घडत असल्याची माहिती जवानांनी दिली आग मोठ्या प्रमाणात असल्याने ठाणे येथून अग्निशमन दलाच्या गाड्या मागविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले, अग्निशमन दलाच्या जवानांनी आग विझवण्याचा शर्थीचे प्रयत्न सुरू केले असुन ही आग कशामुळे लागली याबाबत मात्र अद्याप कारण समजले नाही मात्र विजेचा शॉंट सर्कीट मुळे आग लागल्याचा अंदाज अग्निशमन दलाच्या जवानांकडून वर्तविण्यात आला आहे.पोलिसांनी या आगी संदर्भात नोंद घेतली आहे.

---

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी, जि.ठाणे

## बांधकाम विभाग प्र.स. क्र. ०२

### ई-निवीदा सुचना क्र.१८०/२०२५-२६

भिवंडी नि. शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागा मार्फत खालील नमुद कामाचे निविदा फॉर्म mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०९/०२/२०२६ ते दि.२३/०२/२०२६ पर्यत विक्रिस उपलब्ध आहे.

| अ.क्र. | कामाचे नावं | अंदापत्रकिय रक्कम |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.९ गैबीनगर खान कंम्पाऊंड गटार व पायवाट करणे. | ९,९९,३३६/- |
| २ | वॉर्ड क्र.९ मदर बेकरी शमीम शेठ बिल्डींग खान कंम्पाऊण्ड गटार व पायवाट करणे. | १९,९९,१६२/- |

वरील ऑनलाईन निविदा दि.२३/०२/२०२६ पर्यंत दुपारी ४.०० पर्यंत स्विकारण्यांत येतील. तसेच सदरची निविदा ही दि.२४/०२/२०२६ रोजी संध्या. ४.०१ वाजता अथवा कार्यालयीन कामकाजाच्या सोयीप्रमाणे निविदा समिती समक्ष उघडण्यांत येईल. अधिक माहिती महानगरपालिकेच्या उक्त नमुद संकेत स्थळावरुन प्राप्त होऊ शकेल अथवा नविन शासकिय इमारतीमधील ५ मजल्यावरील बांधकाम विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

जा.क्र./ज.सं.वि./९६
दि. ०६/०२/२०२६

सही/-
(जमील पटेल)
शहर अभियंता
भि.नि. शहर महानगरपालिका, भिवंडी

---

महाराष्ट्र शासन

## तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड यांचे कार्यालय

**तालुका- मुरबाड , जिल्हा - ठाणे**

**कार्यालयाचा पत्ता :- एम.आय.डी.सी. प्लॉट क्र.१४ ता. मुरबाड जि.ठाणे पिन कोड: ४२१४०१**
**दूरध्वनी क्र : ०२५२४-२२२१९९ ई-मेल: tahmurbad@gmail.com**

### जाहिर नोटीस

**प्रति,**
**१) श्रीम. भानु गुरुनाथ कामडी,**
**रा. खंडीचीवाडी-असोळे,**
**ता. मुरबाड, जि. ठाणे..............................अर्जदार**

**विरुद्ध**

**२) ग्रामपंचायत असोळे,**
**जन्म मृत्यु नोंदणी विभाग,**
**ता. मुरबाड, जि. ठाणे.............................सामनेवाले**

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे:

१. उपरोक्त अर्जदार यांचे **आई कै. लाडीबाई शिवराम पारधी**, यांचा मृत्यु दिनांक **०१/०५/२०००** रोजी राहत्या घरी मु. **खंडीचीवाडी-असोळे**, ता. मुरबाड, जि. ठाणे येथे झालेला आहे. अर्जदाराकडून काही अपरिहार्य कारणांमुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्म / मृत्युची नोंद निबंधक, जन्म, मृत्यु नोंदणी विभाग, ता. मुरबाड, जि. ठाणे दप्तरी करुन जन्म / मृत्युचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहिला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तिक कारणांसाठी मृत्यु दाखल्याची आवश्यकता आहे.

२. उशीरा मृत्युची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करून घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज क्र.५९८ दाखल केला आहे.

३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणताही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे यांचे **आई** यांचा मृत्युच्या नोंदणीचा दाखला मिळणे करीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे **०३/०२/२०२६** रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

शिक्का

हुकमावरुन
सही /–
(श्री. महादेव देशमुख)
सहाय्यक महसुल अधिकारी,
मुरबाड

जावक क्रमांक :
फौजदारी/जन्म मृत्यु नोंद /
कावि - /२०२६

---



# कोपर रेल्वे लाईन समांतर रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविण्याच्या कामाला सुरुवात

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** भाजपा नगरसेवक दिपेश म्हात्रे यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिके सोबत केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्या नंतर अखेर मोठागाव, जुनी डोंबिवली – कोपर रेल्वे लाईन समांतर रस्ता येथे स्ट्रीट लाईट बसवण्याचा वर्क ऑर्डर मिळाली आहे. आज या कामाचे भूमिपूजन नगरसेवक दिपेश म्हात्रे यांच्याहस्ते पार पडले. यावेळी मोठागावमधील ग्रामस्थ तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा रस्ता वापरणाऱ्या नागरिकांसाठी ही खूप महत्त्वाची बाब आहे. स्ट्रीट लाईटमुळे रात्रीच्या वेळी सुरक्षितता वाढेल, अपघातांची शक्यता कमी होईल आणि नागरिकांना निर्धास्तपणे प्रवास करता येईल.

---

# शर्मिला पिंपळोलकर महापौरांच्या हस्ते हिंदायान सायक्लोथॉनचा प्रारंभ



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (०८) :** भारत सरकारच्या युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालय तसेच संरक्षण मंत्रालयाच्या सहकार्याने दिल्लीपासून ३० नोव्हेंबर रोजी सुरू झालेली हिंदायान सायक्लोथॉन आज ठाणे येथून मुंबईकडे निघाली. या सायक्लोथॉनला महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपमहापौर कृष्णा पाटील यांनी महापालिका भवन येथे हिरवा झेंडा दाखवून सायकलस्वारांना शुभेच्छा दिल्या.

या हिंदयान सायक्लोथॉनमध्ये उत्स्फूर्तपणे सायकलप्रेमी सहभाग घेतला. तरुणांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्व वयोगटातील सायकलस्वारांचा सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. महिलांचा सहभागही मोठ्या प्रमाणात असल्याने या उपक्रमाला अधिक बळ मिळाले. महापौर शर्मिला पिंपळोलकर आणि उपमहापौर कृष्णा पाटील यांनी सायकलप्रेमींना शुभेच्छा दिल्या. त्यांनी प्रत्येक सायकलस्वाराशी संवाद साधत त्यांच्या अनुभवांबाबत जाणून घेतले.

भारतात सायकलिंगला शाश्वत, आरोग्यदायी व पर्यावरणपूरक वाहतूक माध्यम म्हणून प्रोत्साहनदेणे हा या मागचा उद्देश आहे , दिल्लीपासून सुरू झालेला हा प्रवास ठाण्यातून मुंबईपर्यंत पोहोचत आहे, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे."असे महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी नमूद केले.

उपमहापौर कृष्णा पाटील यांनी 'फिट इंडिया' उपक्रमांतर्गत या सायक्लोथॉनचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, "सायकलिंग हा उत्तम व्यायाम असून तो शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक क्षमता वाढवतो. भविष्यात अशा उपक्रमांमध्ये अधिकाधिक लोकांचा सहभाग वाढला पाहिजे असेही ते म्हणाले.

ठाणे महानगरपालिकेपासून सुरू झालेल्या सायक्लोथॉनचा कुलाबा मिलिटरी स्टेशन, मुंबई येथे समारोप झाला. यावेळी मेजर सागर सावंत यांच्या हस्ते प्रत्येक सायकलप्रेमींना आकर्षक पदक देऊन गौरविण्यात आले. यावेळी विष्णुदास चापके यांनी या सायक्लोथॉन आयोजनामागील उद्देश स्पष्ट करत भविष्यात अधिक संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. यावेळी हिंदायान फाऊंडेशनचे प्रमुख विष्णुदास चापके, आम्ही सायकल प्रेमी फाऊंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा प्रज्ञा म्हात्रे, सदस्य अमोल कुळकर्णी, ठाणे महानगरपालिकेच्या प्र.उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर, दादोजी कोंडदेव क्रीडा प्रेक्षागृहाचे कर्मचारी उपस्थित होते.

---

# जिल्हा प्रमुख चषकावर जय हनुमान भावाळेंचा झेंडा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी :** भिवंडी तालुक्यातील खारबाव येथील " जाणता राजा क्रिकेट संघ " यांच्यावतीने युवा खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी कालवार गांव येथील मैदानात 'जिल्हा प्रमुख चषक २०२६' क्रिकेट स्पर्धा आयोजित केली करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये तालुक्यातील क्रिकेट संघांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन आपल्या खेळाचे प्रदर्शन केले हे क्रिकेट सामने पाहण्यासाठी मोठ्या संख्येने स्थानिक ग्रामस्थांसह युवक व नागरिकांनी मोठी गर्दी केली होती

भिवंडी तालुक्यातील खारबाव येथील जाणता राजा क्रिकेट संघाचे वतीने दरवर्षी युवकांना प्रोत्साहन देण्यासाठी क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात येतात यंदा सुध्दा दि.२ ते गुरूवार.५ फेब्रु.२०२६ दरम्यान जिल्हा प्रमुख चषक २०२६ क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना ग्रामीण जिल्हाप्रमुख डॉ.देवानंद थळे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते टॉस उडवून सामन्याची सुरुवात करण्यात



आली यावेळी शिवसेनेचे सहसंपर्क प्रमुख रमेश तरे,विजय म्हात्रे,जिल्हा परिषद सदस्य गोकुळ नाईक यांच्या सह मान्यवर ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.यावेळी आयोजकांनी सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन डॉ. देवानंद थळे यांचा स्वागत सत्कार केला.अत्यंत चुरशीच्या क्रिकेट स्पर्धेचे जय हनुमान भावाळे हा संघ प्रथम पारितोषिक विजेता ठरला तर जाणता राजा खारबाव हा द्वितीय पारितोषिक विजेता संघ म्हणून पारितोषिक मिळवले. चवठा हिरवा (माणकोली तृतीय पारितोषिक विजेता) देवानंद थळे प्रतिष्ठान (गावदेवी वेहेळे चर्तुथ पारितोषिक विजेता) विजेंद्र पाटील (बेस्ट बॅटर) चेतन तरे (बेस्ट बॉलर) विनित माळी (मॅन ऑफ दि सिरिज) विजेत्यांना सन्मान चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले.क्रिकेट स्पर्धा कार्यक्रमाचे समालोचक डॉ.मोरेश्वर गवळी,संदिप गावंड,शैलेश मांजरेकर, सुभाष धुमाळ यांनी केले. तर पंच म्हणून भाऊ पाटील, प्रल्हाद पाटील,निकलेश बजागे आतिष पाटील यांनी केले ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आयोजकांनी अथक परिश्रम घेतले.क्रिकेट सामना पाहण्यासाठी स्थानिक ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य पदाधिकारी व नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

---

# डोंबिवलीत प्रथमच बारा तास स्टेडियम रन

## रनर्स क्लॅन फाऊंडेशनचा यशस्वी उपक्रम

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** रनर्स क्लॅन फाऊंडेशन, डोंबिवली यांच्या वतीने प्रथमच १२ तास स्टेडियम रनचे आयोजन शनिवारी करण्यात आले होते. ही स्पर्धा डॉ. यू. प्रभाकर राव, मिलाप नगर, डोंबिवली पूर्व या मैदानात सिंथेटिक ट्रॅकवर पार पडली. स्पर्धेचा शुभारंभ कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त अभिनव गोयल यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. या स्पर्धेत चारशेहून अधिक धावपटूंनी सहभाग नोंदवला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून



नामांकित धावपटू या स्पर्धेसाठी सहभागी झाले होते. या स्पर्धेत १०० पेक्षा जास्त स्पर्धक सलग १२ तास धावले तर १५० पेक्षा जास्त स्पर्धक सलग ६ तास आणि १५० पेक्षा जास्त स्पर्धक २ तास रिले रनमध्ये धावले. विशेष म्हणजे या स्पर्धेत १५ महिला नऊवारी साडीमध्ये अस्सल मराठी पोशाखात धावल्या ज्यामुळे महाराष्ट्राची संस्कृती आणि परंपरेचा गौरव झाला. ही स्पर्धा संपूर्ण ठाणे जिल्ह्यातील एकमेव स्पर्धा असून रनर्स क्लॅन फाऊंडेशन या संस्थेने मोठ्या जबाबदारीने पार पाडली.

"एक दौड वीर जवानों के लिए" या थीमअंतर्गत गेटवे ऑफ इंडिया ते डोंबिवली ह्या ६५ किमी अर्बन अल्ट्रा मॅरेथॉनच्या गेल्या पाच वर्षांच्या अभूतपूर्व यशानंतर रनर्स क्लॅन फाऊंडेशन या संस्थेने प्रथमच १२ तास स्टेडियम रनचे धनुष्य हाती घेतले आणि ते यशस्वीपणे पेलवून दाखवले.

संस्थेने विजेता स्पर्धकांना स्थानिक आमदार आणि भाजपा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते प्रोत्साहन बक्षिसांचे वितरण केले.

१२ तास सोलो रनमध्ये प्रथम पारितोषिक विशाल वळवी, महिलांमध्ये सुजाता शाहू, ६ तास सोलो रनमध्ये रामदास मेस्त्री, सोलो महिला मध्ये राणी सिंग आणि रिले मध्ये केडीआरची टीम अव्वल ठरली. शेवटी संस्थेचे कार्याध्यक्ष गिरीश लोखंडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

---

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE
B.A.
B.Com.
B.Sc. CHEMISTRY
B.Sc. MATHS
BAF
BMS
POST GRADUATE
M.Sc. CHEMISTRY
M.Com. ADVANCED ACCOUNTANCY
M.A. MARATHI
M.A. ECONOMICS
M.A. SOCIOLOGY
M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111

---

# पडघ्यात पाणीपुरवठा योजनेचा खेळ खोळंबा; नागरिक हैराण

### सुस्त नागरीक, ग्रामपंचायत, लोकप्रतिनिधींचे उदासीन धोरण कारणीभूत

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**







**पडघा :** वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत आलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील नवीन पाणीपुरवठा योजना विविध कारणामुळे रखडली असुन नागरीकांना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.

सन २०२३ मध्ये जलजिवन मिशन अंतर्गत जलशुद्धीकरण यंत्रणेसह १८ कोटीची नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर झाल्याने आता पाणीटंचाईचे ग्रहण संपेल असे नागरीकांना वाटत होते. त्यासाठी लाखो रुपये खर्च करून मोठा गाजावाजा करत योजनेचे भूमिपूजन करण्यात आले होते त्यानुसार सर्वे नंबर १०१ मध्ये नवीन पाण्याच्या टाकीचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले होते व बहुतांश पडघा गावात चांगले रस्ते खोदून पाईप लाईन टाकण्यात आली मात्र मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तानसा पाईपलाईन पाच्छापुर येथुन पडघ्याला पाणीपुरवठा होणार होता मात्र आता मुंबई महानगर पालिकेने विविध कारणे देत पडघ्याला पाणीपुरवठा करण्यास नकार दिल्याने नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम पुर्णपणे रखडले आहे. त्यामुळे नागरिकांना 1992 साली पडघा ग्रामपंचायतीने सुरू केलेल्या स्वताच्या योजनेचे दुषीत,अपुरे दोन- तीन दीवसांनंतर अनियमित पाणी मिळत असुन त्यासाठी नागरीकांना सर्व कामे सोडून खुप आटा-पीटा करावा लागत. त्यामुळे महीला वर्ग खुप त्रस्त आहे. तसेच या योजनेत काही बिघाड झाल्यास आठ दिवस पाणीपुरवठ्याला मुकावे लागते.दिवसेंदिवस पडघा गावाचे नागरीकरण होत असुन लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्याने सध्या कार्यान्वित असलेली पाणीपुरवठा योजना अपुरी पडत असुन जिर्ण झालेली आहे पडघ्यात पाणीपुरवठा करणारी टाकीही सध्या कमी पडत असुन दिवसभर भरून १५ लाईनी दररोज सोडाव्या लागत आहेत. त्यामुळे मंजुर झालेली जलशुद्धीकरण यंत्रणा, जास्त क्षमतेच्या टाकीसह नवीन पाणीपुरवठा योजना कार्यान्वित होणे ही काळाची गरज आहे मात्र सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत कमीटी, प्रशासन, सुस्त ग्रामस्थ, स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या उदासीन धोरणामुळे ही योजना रखडल्याचे नागरीकांचे म्हणणे आहे.तसेच तत्कालीन मुख्यमंत्री व सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, शिवसेना नेते प्रकाश पाटील आमदार शांताराम मोरे यांनी लक्ष घालूनसुध्दा ही योजना पुर्ण होत नसल्याने नागरीक आश्चर्य व्यक्त करीत आहेत.तसेच योजना रखडल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जलजिवन मिशन अंतर्गत "हर घर जल हर घर नल" योजनेलाही हरताळ फासल्याचे बोलले जात आहे.सदर योजनेसंदर्भात शिवसेना नेते प्रकाश पाटील, सरपंच सायली पाटील, डॉ. संजय पाटील यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेण्याचा नुकताच प्रयत्न केला असता भेट होऊ शकली नाही.

**जलशुद्धीकरण यंत्रणेसह नवीन पाणीपुरवठा कार्यान्वित झाल्यास पडघ्याचा झपाट्याने विकास होणार असुन नवीन पाणीपुरवठा योजना कार्यान्वित होणे काळाची आहे. नवीन पाणीपुरवठा योजना सुरू झाल्यास नागरीकांचा महीलांचा त्रास कमी होईल. तानसा पाईपलाईन मधुन पाणीपुरवठा करण्यास परवानगी नसताना योजनेचे काम कुणाच्या आदेशावरून ठेदाराने सुरू केले यांची उच्चस्तरीय चौकशी होण्याची गरज आहे. रखडलेली नवीन पाणीपुरवठा योजना येणाऱ्या जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणुकीत कळीचा मुद्दा ठरणार.**

# अंबरनाथ तालुक्यात सात अनधिकृत शाळांचा पर्दाफाश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ :** अंबरनाथ तालुक्यातील सात शाळा अनधिकृत ठरविल्या आहेत. शाळांत पालकांनी पाल्यांसाठी प्रवेश घेऊ नयेत, असे आवाहन गटशिक्षण अधिकाऱ्यांनी केले.अनधिकृत शाळांची यादी अंबरनाथ पंचायत समितीच्या शिक्षण विभागाने जाहीर केली आहे. पालकांनी आपल्या पाल्यासाठी शाळेत प्रवेश घेताना शाळा अधिकृत आहे किंवा नाही याची खातरजमा करणे आवश्यक आहे. अंबरनाथ पंचायत समितीच्या शिक्षण विभागाने ठाणे जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना तालुक्यातील अनधिकृत शाळांची माहिती दिली आहे. यामध्ये सात अनधिकृत शाळांना वेळोवेळी नोटीस बजावण्यात आली आहे. शाळांवर गुन्हेदेखील दाखल केल्याचे कळविले.

**शाळांची यादी जाहीर**

पंचायत समितीने अनधिकृत घोषित करून गुन्हे दाखल केलेल्या शाळांत कुळगाव-बदलापूर येथील अनिरुद्ध हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज आणि श्री चैतन्य टेक्नो स्कूल यांचा समावेश आहे. वांगणी येथील नवजीवन इंटरनॅशनल स्कूल आणि अडवली भाल येथील तिसाई विद्यालय प्राथमिक शाळा, तिसाई विद्यालय माध्यमिक शाळा, श्री स्वामी समर्थ विद्यामंदिर प्राथमिक शाळा, श्री स्वामी समर्थ विद्यामंदिर माध्यमिक शाळा, अशा एकूण सात शाळांचा समावेश आहे.

**शाळांवर गुन्हे दाखल**

यापूर्वी पंचायत समिती गटशिक्षण अधिकारी डॉ. विशाल पोतेकर यांनी अनधिकृत शाळा बंद करण्याबाबत नोटीस बजावली होती. त्यांच्यावर गुन्हा दाखल करून अनधिकृत शाळा म्हणून घोषित केल्याचे पोतेकर यांनी सांगितले.

# बल्याणी येथे ऊर्सनिमित्त लावलेले ठाकरे गटाचे बॅनर फाडले




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : बल्याणी विभागात पीर वली शाह दर्गा ऊर्स २०२६ निमित्त प्रभाग क्र. 4 मध्ये लावण्यात आलेले शिवसेना ठाकरे गटाचे केडीएमसीचे नवनिर्वाचित नगरसेवक राहुल कोट आणि तेजश्री गायकवाड यांचे अधिकृत बॅनर काही समाजकंटकांकडून फाडण्यात आल्याची घटना घडली आहे.

या प्रकारामुळे परिसरात नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून संबंधितांनी जाणूनबुजून सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात येत आहे. सदर कृत्य अत्यंत निंदनीय असून लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या भावना दुखावणारे आहे.

या घटनेमागील दोषींवर पोलिस प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. जर संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात आली नाही, तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या संपूर्ण घटनेचा जाहीर निषेध करण्यात येत असून पोलिस प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी स्थानिक नागरिक व कार्यकर्त्यांकडून करण्यात आली आहे.

# योगदान फाउंडेशन ट्रस्टकडून 'माझा रुपया निसर्गासाठी' लोकसहभाग उपक्रमाची सुरुवात

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे पाणीटंचाई, वाढते तापमान आणि त्यामुळे पक्षी व इतर व जीवसृष्टीसमोर निर्माण होणाऱ्या अडचणी लक्षात घेता, योगदान फाउंडेशन ट्रस्टतर्फे माझा रूपया निसर्गासाठी' या लोकसहभाग उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक व्यक्तीने फक्त एक रुपया योगदान देऊन निसर्ग संवर्धनासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.







सध्याच्या काळात निसर्ग संरक्षणासाठी मोठ्या देणग्यांपेक्षा सामूहिक सहभाग अधिक प्रभावी ठरतो या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. प्रत्येकासाठी सहज शक्य असलेले एक रुपये योगदान हे या मोहिमेचे वैशिष्ट्य असून, कोणताही आर्थिक बोजा न पडता प्रत्येक नागरिकाला निसर्गासाठी आपली जबाबदारी पार पाडण्याची संधी या माध्यमातून मिळत आहे.या उपक्रमांतर्गत जमा होणाऱ्या योगदानातून पक्ष्यांसाठी पाणपोई उभारणे, वृक्षरोपण करणे, पक्ष्यांसाठी प्राथमिक उपचार केंद्र सुरू करणे, तसेच निसर्ग संवर्धनाबाबत जनजागृती करणे असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. विशेषतः उन्हाळ्याच्या काळात पाण्याअभावी होणारे पक्ष्यांचे हाल कमी करण्यावर या मोहिमेचा भर राहणार आहे.

योगदान फाउंडेशन ट्रस्टचे अध्यक्ष मदनमोहन चव्हाण यांनी सांगितले की, "₹1 ही केवळ रक्कम नसून निसर्गासाठी दिलेला सहभाग आहे. मोठ्या योगदानाची अपेक्षा न ठेवता, सामान्य माणसालाच या चळवळीच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे."

या उपक्रमाच्या माध्यमातून निसर्ग संवर्धन ही केवळ संस्था किंवा शासनाची जबाबदारी नसून, समाजातील प्रत्येक घटकाची सामूहिक जबाबदारी आहे, हा संदेश जनमानसापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे.
नागरिकांनी या लोकसहभाग उपक्रमात सहभागी होऊन *"माझा ₹1 निसर्गासाठी"* या संकल्पनेला पाठबळ द्यावे, असे आवाहन योगदान फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

# भिवंडीतील गोविंदनगरमध्ये आयुष्मान आरोग्य मंदिर



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : भिवंडी महानगर पालिका वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत गोविंद नगर येथे नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर सुरू करण्यात आले आहे. या आरोग्य मंदिराच्या माध्यमातून स्थानिक नागरिकांना प्राथमिक आरोग्य सेवा, तपासण्या तसेच विविध आजारांवरील उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत डॉक्टरांनी दिली.

सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सुलभ व प्रभावी व्हाव्यात, या उद्देशाने नागरी आयुष्मान आरोग्य मंदिरामध्ये वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. भिवंडीतील गोविंद नगर व आसपासच्या परिसरात मोठ्या संख्येने कामगार वर्ग वस्तीने राहत आहेत त्यांना या सुविधांचा लाभ मिळणार आहे. सर्व नागरिकांनी याचा जास्तीत जास्त उपयोग करावा असे महापालिकेच्या प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मीरा रोड** : मीरा रोड भागात राहणाऱ्या १६ वर्षीय अल्पवयीनवर अत्याचार केल्याची घटना घडली आहे. पीडिता गर्भवती राहिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला असून, नवघर पोलिस ठाण्यात आरोपी तरुणाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

नोव्हेंबरमध्ये पीडित मुलगी ही तिच्या मैत्रिणीच्या भाईंदर पूर्व भागातील घरी गेली होती. त्यावेळी तिच्या मैत्रिणीचा परिचित असलेल्या मीरा रोडच्या शीतल नगरमध्ये राहणाऱ्या २० वर्षीय मित्राने घर पाहण्याचा बहाणा करून अल्पवयीन मुलीशी जबरदस्ती अत्याचार केला. दरम्यान, मुलगी गर्भवती राहिल्यानंतर तिच्या फिर्यादीवरून नवघर पोलिस ठाण्यात बलात्कारासह पॉक्सोनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करण्यासह गुन्ह्याचा आढावा घेतला.

# पाटील बालमंदिर शाळेत संस्कृती, परंपरा व इतिहास प्रकल्पाचे भव्य आयोजन

## त्रिदल नॉलेज सिटी प्रकल्प प्रदर्शनाचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : मोहने येथील त्रिदल एज्युकेशन सोसायटीच्या पाटील बालमंदिर शाळेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी "संस्कृती, परंपरा आणि इतिहास" या विषयावर त्रिदल नॉलेज सिटी प्रकल्प हा एक महत्वपूर्ण शैक्षणिक प्रकल्प यशस्वीरीत्या राबविण्यात आला.



या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृतीची ओळख निर्माण करणे, पारंपरिक मूल्यांचे महत्त्व समजावून सांगणे तसेच भारताच्या गौरवशाली इतिहासाची माहिती देणे हा होता. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भाषण, नाट्यछटा, गीत, वेशभूषा व चित्रप्रदर्शनाच्या माध्यमातून आपली कला सादर केली.विद्यार्थ्यांनी भारतीय सण-उत्सव, सामाजिक परंपरा तसेच छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या थोर व्यक्तिमत्त्वांच्या कार्यावर प्रभावी सादरीकरण केले. त्यांच्या सादरीकरणातून संस्कृती जपण्याचा आणि इतिहासातून प्रेरणा घेण्याचा संदेश देण्यात आला.
कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व पालकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, सामाजिक जाणीव आणि नैतिक मूल्ये रुजतात, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. पाटील बालमंदिर शाळेच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीचा अभिमान वाटावा, हीच या कार्यक्रमाची खरी फलश्रुती ठरली.
या कार्यक्रमासाठी केडीएमसीच्या महापौर हर्षाली चौधरी थविल, कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे, नगरसेवक गणेश कोट, रोहन कोट, राहुल कोट, नगरसेविका तेजश्री गायकवाड, माजी नगरसेवक दुर्योधन पाटील, दशरथ तरे,सामाजिक कार्यकर्ते सुरेश सोनार, जेसी कटारिया, रामा कांबळे, वैभव पाटील आदी मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.
तर त्रिदल एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी एस जे पाटील, जी एल पाटील, प्राचार्य बी एन पाटील, संध्या पाटील, सुदर्शन पाटील, आशिष पाटील, स्वप्निल पाटील, शाळेचे मुख्याध्यापक बी.पी. निचिते, व्हि.डी. चौथे, रुपाली सावदेकर, लिजी नांबियार, वरिष्ठ शिक्षिका संगिता पाटील, वरिष्ठ शिक्षक विकास पाटील, समस्त शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# बांडोडकर महाविद्यालयात 'राष्ट्रीय आवर्त सारणी दिन' उत्साहात साजरा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांडोडकर विज्ञान महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाच्या ऊर्जा क्लब अंतर्गत ७ फेब्रुवारी रोजी 'राष्ट्रीय आवर्त सारणी दिन' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये रसायनशास्त्राविषयी जिज्ञासा, वैज्ञानिक दृष्टिकोन व संशोधनाची प्रेरणा निर्माण झाली.
या कार्यक्रमाला रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अजित भूमकर, केमिस्ट्री क्लबचे समन्वयक डॉ. प्रल्हाद वाघ, कार्यक्रम समन्वयक प्रा. जयदीप वाबळे, वक्ते प्रा. रुपेश बच्छाव, तसेच विभागातील प्राध्यापकवर्ग व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.
कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. प्रल्हाद वाघ यांनी स्वागतपर भाषणात आवर्त सारणीचे शास्त्रीय व दैनंदिन जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. "आवर्त सारणी ही रसायनशास्त्राची




कणा असून आपल्या जीवनातील प्रत्येक घटक तिच्याशी जोडलेला आहे," असे त्यांनी नमूद केले.
यानंतर डॉ. अजित भूमकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करत आवर्त सारणीचे शैक्षणिक व संशोधनात्मक महत्त्व स्पष्ट केले आणि विद्यार्थ्यांनी उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहन केले.
कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट करताना प्रा. जयदीप वाबळे यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी स्पर्धांमधील सहभाग किती महत्त्वाचा आहे, यावर भर दिला.
यावेळी प्रा. रुपेश बच्छाव यांनी आवर्त सारणीची उत्क्रांती, घटकांचे महत्त्व आणि आधुनिक संशोधनातील त्यांचे स्थान यावर प्रेरणादायी मार्गदर्शन केले.
विद्यार्थ्यांमध्ये रसायनशास्त्राविषयी आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने पोस्टर प्रेझेंटेशन व प्रश्नमंजुषा (क्विझ) स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. पोस्टर स्पर्धेचे परीक्षण प्रा. ऋषिकेश लभाडे यांनी अत्यंत सखोल व प्रभावी पद्धतीने केले. विद्यार्थ्यांनी आवर्त सारणीच्या इतिहासापासून आधुनिक उपयोगांपर्यंत विविध विषयांवर आकर्षक पोस्टर्स सादर करून आपली सर्जनशीलता व शास्त्रीय दृष्टिकोन प्रभावीपणे मांडला. क्विझ स्पर्धेतही विद्यार्थ्यांनी ज्ञान व तर्कशक्तीचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.
स्पर्धांतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रग्या दुबे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ऊर्जा क्लब विद्यार्थी सचिव हर्षदा राऊत व सहसचिव नील पाचकुडे यांनी विशेष परिश्रम घेतले.शेवटी डॉ. रुपेश पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.रसायनशास्त्र विभागाच्या उत्कृष्ट नियोजनामुळे 'राष्ट्रीय आवर्त सारणी दिन' हा उपक्रम ज्ञानवर्धक, प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला.

# प्राथमिक शिक्षक दशरथ ईसामे यांचे हृदय विकाराच्या झटक्याने निधन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : गेले ३५ वर्ष शिक्षण क्षेत्रात अध्यापनाचे मौलीक कार्य करणारे प्राथमिक शिक्षक दशरथ ईसामे यांचे वयाच्या ५८ व्या वर्षी हृदय विकाराच्या झटक्याने दुख्खद निधन झाले आहे.



दशरथ ईसामे हे शिवळे येथिल सुपुत्र असून शैक्षणिक क्षेत्राबरोबरच श्रीसमर्थ बैठक सांप्रदायाशी जोडले गेले होते. याकाळात त्यांनी शैक्षणिक कार्याबरोबर अध्यात्मिक विचार पोहचवण्याचे महत्वाचे काम केले आहे. शांत, प्रेमळ स्वभाव, सर्वाशी प्रेमाचे, जिव्हाळयाचे संबंध असल्याने त्यांनी मोठा मित्र परिवार निर्माण केला होता.

शनिवारी सायंकाळी त्यांच्या छातीत अचानक दुखू लागल्याने त्यांना उपचारासाठी दवाखान्यात नेण्यात आले होते परंतु तीव्र झटक्यामुळे त्यांची प्राण ज्योत मालवली.सोशल मिडियावर त्यांच्या निधनाची बातमी समजताच सर्वत्र हळहळ व दुख्ख व्यक्त करण्यात येत आहे.त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी व चार मुली असा परिवार असून त्यांच्या अंत्यविधी साठी मोठ्या संख्येने त्यांचे नातेवाईक, मित्रपरिवार उपस्थित होता.त्यांच्या अशा अचानक जाण्याने त्यांचे कुटुंब, इसामे परिवार, नातेवाईक शोकसागरात बुडाले आहेत.

# प्रा. वृषाली मगदूम यांना सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी मुंबई** : यशवंतराव दाते स्मृती संस्थेतर्फे आयोजित ज्येष्ठ विचारवंत डॉ.भा.ल. भोळे व डॉ. यशवंत सुमंत स्मृती सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार वर्धा येथे आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ विचारवंत डॉ. अभय बंग यांच्या हस्ते नवी मुंबईतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या प्रा. वृषाली मगदूम यांना प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल व रोख वीस हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप होते. समारंभात महाराष्ट्रातील चार सन्मानार्थींना पुरस्कार देण्यात आले. यात मुंबईतील राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष गजानन कोटेवार यांनाही कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.

दीपक गायकवाड, पुणे (वैचारिक लेखन), डॉ. देवकुमार अहिरे, पुणे (संशोधन- युवा) आणि डॉ. नागोराव, लातूर (जीवनगौरव) यांना प्रदान करण्यात आले. वृषाली मगदूम यांनी मनोगतात, समाजातील शेवटच्या घटकातील कचरा वेचणाऱ्या महिलांचे दारिद्र्य संपलेले नसले तरी त्या वैचारिकदृष्ट्या सजग आणि कणखर झाल्या आहेत, असे निरीक्षण नोंदवले.




# लोकशाहीच्या उत्सवात पेणकरांचा सक्रिय सहभाग

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : पेण तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या पाच आणि पंचायत समित्यांच्या दहा गणांसाठी शनिवारी सकाळी ७:३० पासून मतदानाला सुरुवात झाली आहे. पण, पहिल्या दोन तासांत अत्यंत संथ गतीने मतदान झाले आहे. सकाळी ९:३० या दोन तासांत अवघे ११ टक्के मतदान झाले आहे, त्यामुळे उमेदवार आणि नेतेमंडळींची धाकधूक वाढली होती. मात्र, त्यानंतर पुढील दोन-दोन तासांच्या तीन टप्प्यांच्या कालावधीत दोन तासागणिक १६ टक्क्यांनी वाढ होत दुपारी ३:३० वाजेपर्यंत मतदानाची टक्केवारी ६० टक्क्यांवर जाऊन ठेपली. शेवटच्या दोन तासांत अंतिम क्षणी ७६ ते ८० टक्के मतदार हक्क बजावतील, हे मतदारांचा उत्साह पाहून दिसून आले. प्रत्येक केंद्रावर महिला, युवा वर्गाने उत्साहात मतदानासाठी रांगा लावल्या होत्या. पेण ग्रामीणमध्ये गावोगावच्या मतदान केंद्रावर कुठेही गडबड गोंधळ न होता शांततेत मतदान झाले.

**वऱ्हाडी, सगे-सोयरेही मतदानासाठी केंद्रांवर** : आज पेण ग्रामीण विभागात गावोगावी लग्नसोहळे असल्याने सकाळी दोन तास वऱ्हाडी मंडळी लग्न मंडपात गुंतून पडली होती, मात्र लग्नाचा बँडबाजा, वाजंत्री वाजू लागतात वऱ्हाडी, सगे-सोयऱ्यांनी मतदान केंद्रावर जाऊन आधी मतदानाचा हक्क बजावला. त्यामुळे ११:३० वाजेपर्यंत मतदानाचा टक्का पाच टक्क्यांनी भर पडत वाढला तो २७.१६, टक्के झाला. ही आकडेवारी दुपारी ३:३० वाजता ६० टक्के झाली.

**ज्येष्ठांनी व्हीलचेअरवर येऊन केले मतदान**:पाच जिल्हा परिषद गटातील १ लाख ३९ हजार ४७९ एकूण मतदारांपैकी ३:३० पर्यंत ८३ हजार, ६८५ मतदारांनी कर्तव्य बजावले. यामध्ये ४१,८६७ पुरुष, तर ४१,८१८ महिला मतदारांचा समावेश आहे. गट गणनिहाय सर्व उमेदवार, तर दादर गटातील रावे पंचायत समिती गणात रावे केंद्रावर आमदार रवींद्र पाटील यांनी सकाळी मतदान केले.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024